पुष्पक

को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

(बी.ओ.एम./डब्ल्यु.एस./आर.एस.आर./सी.आर./८३७४/दि.३१/१२/९८)

रौप्य महोत्सवी वर्ष

रौप्य महोत्सवी वर्ष

25

1998 2023

|| वाटचाल अर्थसेवेची...
चमक विश्वासाची... ||

२५ वा वार्षिक अहवाल २०२२-२०२३

प्रशासकीय कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८
०२२ २५७८ ०२३६ / ७०२८०००७८७ www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

1998 - 2023

श्री. व्हि. जी. पवार
मार्गदर्शक
संस्थापक : ज्ञानदीप को. ऑप. क्रे. सोसा.

श्री. गणपतराव पवार
अध्यक्ष

श्री. संभाजी पवार
उपाध्यक्ष

संचालक

श्री. परशुराम फडतरे

श्री. अंकुश संकपाळ

श्री. अर्जुन भोसले

श्री. नारायण कुदळे

श्री. श्रीकांत कांबळे

श्री. व्यासदेव पवार

सौ. शशिकला पवार

सौ. मिनाक्षी ढमाळ

श्री. नारायण पालवे

श्री. विनायक तळेकर

श्री. किरण पवार
मुख्यव्यवस्थापक

पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

रौप्य महोत्सवी वर्ष

❁ २५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❁

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २५वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. १७ सप्टेंबर २०२३** रोजी **सकाळी ११ वाजता** संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. जी. ए. पवार** यांच्या अध्यक्षतेखाली **आम्रपाली बँक्वेट हॉल, युनिक आर्केड बिल्डींग, डॉन बॉस्को शाळेजवळ, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ८३** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

❁ सभेपुढील विषय ❁

१) दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सादर करुन त्यास मंजुरी देणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) लेखापरिक्षकांकडून आलेल्या सन २०२२-२३ सालचा अहवाल वाचुन नोंद घेणे.

५) सन २०२३-२४ सालासाठी वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे.

६) मागील वर्षी अंदाजपत्रकाप्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२३-२४ सालचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

७) सन २०२१-२२ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.

८) कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.

९) पोटनियम दुरुस्तीबाबत - निधी - ७ - अतिरिक्त भाग सभासदांना परत करणेबाबत.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला सहकारी,
संभाजी गे. पवार
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई - ४०० ०७८.
दिनांक : १२ ऑगस्ट २०२३

वाटचाल अर्थसेवेची... चमक विश्वासाची...

❁ विशेष सुचना ❁

१) गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दिनांक १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) संस्थेची वार्षिक अहवालाची प्रत संस्थेची वेबसाईट www.pushpaksociety.com वर उपलब्ध आहे.

४) ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्र. याबाबतची माहिती संस्थेत नोंद केली नसेल त्यांनी आपल्या जवळच्या संस्थेच्या शाखेत किंवा मोबाईल क्र. ७०२८०००७८७ वर सादर करावी.

अध्यक्षांचे मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आज आपल्या संस्थेचा २५ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला विशेष आनंद होत आहे, त्याला कारण ही तसेच आहे आपल्या संस्थेला २४ वर्ष पुर्ण होऊन आता २५ व्या वर्षाची वाटचाल करीत आहे. पण ही वाटचाल आपल्याला वाटते तितकी सोपी नव्हती बरं का ! कारण आजकालच्या स्पर्धेच्या युगात सतत अविरत पणे चालत राहणे म्हणजे एक दिव्य गोष्टच नाही का ? लोकांच्यासाठी झटणे, त्यांना हवे तेव्हा मार्ग सुकर करुन त्यांच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी देणे, आणि या सर्वांचा विचार करुन नव-नवीन योजना राबविणे त्या अंमलात आणणे जेणेकरुन लोकांना या सर्वांचा फायदा घेता यावा. कुटुंबाची राहण्याची व्यवस्था अर्थात, घरासाठी लागणारा पैसा उभा करणे, मुलांची लग्न, शिक्षण या सारख्या एक ना अनेक गोष्टींसाठी आपली संस्था समाजासाठी कार्य करीत आहे.

संस्थेची समाजाप्रती असणारी बांधिलकी, आपुलकी, प्रेम आणि जिव्हाळा या सर्वांच्या जोरावर २५ वर्षे कधी गाठली हे सुध्दा कळले नाही. आणि आज एक नावलौकिक घेऊन सर्वांच्या मनावर राज्य करीत आहे. कारण पुष्पक म्हणजे एक संस्था नसून एक परिवार आहे आणि हा परिवार म्हणजे कोणी एक माणूस नसून संस्थेचा असंख्य असा सभासद वर्ग, ठेवीदार व कर्जदार, संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग, दै. ठेव प्रतिनिधी व हितचिंतक अशा अंगाने तयार झालेला आहे.

संस्थेने आतापर्यंत सर्वांना आपले मानून मदतीचा हात पुढे केला आहे. परंतु समाजाने सुध्दा संस्थेचा विचार करुन आपली संस्थेप्रती असणारी जबाबदारी ओळखावी आणि त्यानुसार सहकार्य करावे. सभासदांना विनंती आहे की त्यांनी सुध्दा कर्जाचे हप्ते वेळेवर भरावेत व संस्थेला मदत करावी. कठोर कारवाई करण्यास संस्थेला भाग पाडू नये. जेणे करुन संस्थेचा व आपला वेळ वाया जाईल व त्याचा नाहक त्रास आपणां सर्वांना सहन करावा लागेल म्हणून अशा गोष्टींपासून सर्वांनीच लांब राहणे योग्य होईल.

२५ व्या वर्षात संस्थेने पदार्पण केल्यावर अनेक नवनवीन संकल्पना सभासदांसाठी राबविण्यात येणार आहेत. तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. संस्थेने आतापर्यंत १५ शाखांचा विस्तार केलेला आहे आणि यापुढेही शाखा विस्तार वाढत राहील, स्व-मालकीच्या जागेत शाखांचा विस्तार करणे म्हणजे संस्थेसाठी एक वेगळीच उर्जा असते असे उर्जा स्त्रोत अजूनपण आपण तयार करीत आहोत. जेणे करुन काम करताना आपल्याला सतत एकच गोष्ट लक्षात आली पाहिजे ती म्हणजे आपली समाजाप्रती असलेली जबाबदारी अजून तरी संपलेली नाही, अजून खूप समाजसेवा बाकी आहे. हे सर्व करत असताना जे मानसिक समाधान मिळते त्याचा अनुभव काही वेगळाच असतो. कारण इतर आनंदापेक्षा आपला जीव एका गरजवंताच्या कामी आला ही जी आत्मिक समाधान देणारी गोष्ट आहे, ती अनुभूती सगळ्या गोष्टींपेक्षा श्रेष्ठ असते. म्हणूनच तर म्हणतात, जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले ! तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा ।। पुष्पक संस्था सुध्दा चांगल्या लोकांच्या आचार-विचाराने ओत-प्रोत भरलेली आहे. येथे येणारा प्रत्येक सभासद अगदी मनापासून तृप्त होऊनच जातो आणि इतरानांही त्या तृप्तीचा आनंद घेण्यास सांगत असतो. संस्थेने आता सी. बी. एस. प्रणालीचा अविष्कार अवलंबिलेला आहे. जेणे करुन सभासद कोठेही गेला तरी तो रिकाम्या हाती परत गेला नाही पाहिजे, त्याचे काम झाले पाहिजे अशा एक ना अनेक नवीन कार्याचा शुभारंभ येणाऱ्या २५ व्या वर्षात करणार आहोत. मी व संचालक मंडळ या गोष्टींसाठी सदैव प्रयत्नशील राहु तसेच आपणा सर्वांच्या सेवेत कर्मचारी वृंद व दैनंदिन ठेव प्रतिनिधी कायम आहेत आणि असतील याची मी अध्यक्ष म्हणून आपणा सर्वांना ग्वाही देतो आणि माझे मनोगत पुर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

।। विना सहकार नाही उध्दार ।।

आपला हितचिंतक,

श्री. गणपतराव आ. पवार

अध्यक्ष

❋ वार्षिक कार्यवृत्तांत ❋

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सन २०२३-२४ हे वर्ष आपल्यासाठी विशेष महत्वाचे असून आपल्या संस्थेने रौप्य महोत्सवी वर्षात पर्दापण केलेले आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संस्था ठेवींच्या अनेक योजना व कर्जासाठीचे सुलभ धोरण राबवित आहे. रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता ३१ डिसेंबर २०२३ रोजी होत आहे. तत्पुर्वी सर्व सभासदांचा एकत्रित स्नेह मेळावा कार्यक्रम घेण्याचा संस्थेचा मानस आहे.

सहकार क्षेत्रामध्ये संस्थेने आपले वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. आपण करीत असलेल्या कार्याचा गौरव श्री शनैश्वर देवस्थान सोळशी, ता. कोरेगाव, जि. सातारा यांनी संस्थेस पुरस्कार प्रदान करुन केलेला आहे.

संस्थेवर दर्शविलेल्या विश्वासाप्रती व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीस सदैव पाठिंबा देणाऱ्या भागधारकांचा मी ऋणी आहे. प्रगतीमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या सभासदांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. संस्थेला सातत्याने प्रगती पथावर अग्रेसर ठेवण्यास संस्थेच्या सर्व कर्मचारीवृदांचे लाभत असलेले योगदान देखील आव्हानात्मक परिस्थितीत महत्वाचे ठरते. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गाचे संचालक मंडळाच्या वतीने मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

संस्थेचा सन २०२२-२३ चा २५ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

संचालक मंडळ :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या १५ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली राहिली. संचालक मंडळाच्या सभेशिवाय इतर सामाजिक कामांमध्ये संचालक सदस्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. अशा प्रकारच्या कळकळीच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सतत होत आहे. संचालक मंडळातील सर्व संचालकांच्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभासद :

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सभासद संख्या ११३४० होती. यामध्ये प्रत्यक्षात २३५७ नविन सभासदांची नोंद झाली आहे. अहवाल सालात १७६ सभासदांनी राजीनामा दिले आहे. त्यामुळे अहवाल सालाअखेरीस संस्थेचे एकूण सभासद १३५२१ झाले आहेत. सभासदांनी ३१ मार्च २०२३ अखेर जमा असलेला भाग रक्कमेचे दाखले घेवून जावेत. एका सभासदाला रु. २ लाखांपर्यंत भाग खरेदी करता येतील. जास्तीत जास्त भाग खरेदी करुन संस्थेच्या विकासाला हातभार लावावा.

भागभांडवल :

संस्थेचे अहवाल सालच्या सुरुवातीस रु. ४,६०,५८,७००/- एवढे वसुल भागभांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून जादा भागभांडवल रु. १,७५,५२,०००/- वसुल झाल्याने वाढ झाली आहे. तसेच १७६ सभासदांनी राजीनामा दिल्याने रु. ४१,९५,८००/- भागभांडवल कमी होऊन अहवाल सालाअखेर वसुल भागभांडवल रु. ५,९४,१४,९००/- एवढे झाले आहे. भागभांडवलात होणारी वाढ म्हणजेच सभासदांचा संस्थेवरील असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

राखीव निधी :

गतवर्षीच्या रु. १,२५,२३,६४७/- निधीमध्ये नफ्यातून रु. १९,१३,१९४/- व आर्थिक वर्षात प्रवेश फी नाममात्र सभासद फी रु. ४९,१२०/- न घेतलेला लाभांश असे रु. ५३,२६७/- अशी रु. २०,१५,५८१/- ने वाढ होऊन अहवाल सालाअखेर राखीव निधी रु. १,४५,३९,२२८/- झालेला आहे. निधीतील वाढीचे प्रमाण १६.०९% असुन निधीची कायद्यातील तरतुदीनुसार गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या निधीत होणारी वाढ संस्थेचा पाया मजबूत करणारी आहे.

अन्य निधी :

गतवर्षी अन्य निधी रु. ३,६२,७७,१७७/- असुन व्याज रु. ४८,०८,१५४/- ने वाढ होवून मार्च २०२३ अखेर एकूण अन्य निधी रु. ४,१०,८५,३३३/- झालेला आहे. अन्य निधीतील वाढीचे प्रमाण १३.२५% आहे.

ठेवी :

संस्था देत असलेल्या ग्राहक सेवेमुळे तसेच संचालक मंडळ, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने व तुम्हां सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या ठेवीमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ठेवी मध्ये वाढ करत असताना सभासदांच्या जास्तीत जास्त हिताचा व संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन ठेवीला जास्तीत जास्त व्याज देण्याचा संचालक मंडळाने प्रयत्न केलेला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,२४,५५,५१,२४७/- जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये रु. २२,१४,३६,३०४/- वाढ झाल्यामुळे वर्षअखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,४६,६९,८७,५५१/- जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये १७.७८% वाढ झालेली आहे.

कर्ज :

सभासदांच्या आवश्यकतेनुसार व सुरक्षिततेचा विचार करुन जास्तीत जास्त सभासदांना अर्थ सहाय्य करण्याचा प्रयत्न केला आहे. चालू वर्षात सभासदांना रु. ५५,६८,७६,५९६/- कर्जाचे वाटप केलेले आहे. सहकार क्षेत्रातील स्पर्धा इतर आर्थिक संस्थाचे व्याजदर यामुळे चांगले कर्जदार सभासद संस्थेस सोडून जात आहेत याची दखल घेऊन कर्ज व्याजदरात विविधता आणली आहे. कमी रकमेचे व जास्तीत जास्त सभासदांना कर्ज वाटप करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

कर्ज हे संस्थेची मालमत्ता आहे. त्यातूनच संस्थेला उत्पन्न मिळत असते. चांगले कर्जदार मिळणे ही सुध्दा एक स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकाव धरुन संस्थेने चालू वर्षात भरीव कर्ज वितरण करुन कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत वाढ केलेली आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने महिलांना वैयक्तिक कर्ज संस्थेच्या शाखा स्तरावर देण्याची योजना चालू केली आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस रु. १,१९,९०,०४,२४१/- कर्ज येणे बाकी होते. अहवालसालात रु. ५५,६८,७६,५९६/- कर्ज वितरित केले असुन रु. ४०,१५,१५,२१३/- कर्ज वसुल झालेले आहे. मागील वर्षापेक्षा रु. १५,५३,६१,३८३/- ने कर्जामध्ये वाढ झाली असून वर्षा अखेरीस रु. १,३५,४३,६५,६२४/- कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात येणे कर्जात १२.९६% वाढ झाली आहे.

थकबाकी व वसुली :

थकबाकी व वसुली सर्वच आर्थिक क्षेत्रा समोरील एक आव्हान आहे. या आव्हानांचा संस्था मुकाबला करुन थकबाकी कमी करण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. थकीत कर्जदारांशी थेट चर्चा करुन त्यांच्या आर्थिक स्थितीचा व अडचणीचा विचार करुन मार्ग काढण्यासाठीचा प्रयत्न आहे. मृत झालेल्या कर्जदार सभासदांना व्याज, दंडव्याज व वसुली खर्चात सवलत देऊन एक रकमी भरण्यास सदर खाते थकबाकीतून काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होत आहे. चालू वर्षात थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम १०१ नुसार दावे दाखल केले आहेत.

संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत. संस्थेचा स्वतंत्र कर्ज वसुली विभाग ही अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली अधिकारी व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामिनदारांशी संपर्क साधुन कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

नफा :

आर्थिक क्षेत्रातील स्पर्धात्मक स्थितीत ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर त्याप्रमाणात ठेवावे लागतात. संस्थेने कर्जामध्ये गुणात्मक वाढ करुन व गुंतवणूकीचे सुयोग्य नियोजन करुन जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

अहवाल सालात निव्वळ नफा रु. ८८,६६,७९७/- झाला असून त्यात मागील वर्षाचा नफा रु. ४,९१५/- मिळवून विभागणीसाठी रु. ८८,७१,७१२/- नफा आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

राखीव निधी	२५%	२२,१७,९२८/-
लाभांश भाग रक्कम वर प्रमाणात	१०%	४४,२६,३१८/-
सभासद कल्याण निधी		५०,०००/-
इमारत निधी		५,००,०००/-
कर्मचारी कल्याण निधी		२५,०००/-
बुडीत व संशयीत कर्ज निधी		१३,००,०००/-
रौप्य महोत्सव वर्ष निधी		३,५०,०००/-
पुढील वर्षाकरीता शिल्लक		२,४६६/-
एकूण		**८८,७१,७१२/-**

लाभांश :

संस्था सभासदाचे हित जोपासताना संस्थेच्या आर्थिक आकडेवारीचा विचार करुन जास्तीत जास्त लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. संचालक मंडळाने जाहीर केलेल्या भाग संकलन ठेव योजनेत अनेक सभासदांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. त्याचबरोबर संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने संचालक मंडळाने सभासदांना चालु वर्षात १०% दराने लाभांश वाटपास मंजुरी दिलेली आहे. आपण त्यास वार्षिक सभेत मंजुरी द्यावी अशी आपणांस विनंती आहे.

खेळते भांडवल :

गतवर्षी संस्थेचे खेळते भांडवल रु. १,५४,३५,५६,४५३/- होते. त्यात रु. २२,७५,८८,८९४/- ने वाढ होवून वर्षाअखेरीस खेळते भांडवल रु. १,७७,११,४५,३४७/- झालेले आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलातील वाढ १४.७४% इतकी आहे. संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये सातत्याने होणारी वाढ संस्थेची आर्थिक प्रगती दर्शविते.

लेखा परिक्षण :

संस्थेच्या दि. २४/९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२२-२३ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी अधिकृत लेखापालांच्या सुचीमधून मे. एच. पी. भालेकर ॲन्ड असोसिएटस, सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे. संस्थेचे कामकाज व प्रगतीबाबत लेखापरिक्षक यांनी समाधान व्यक्त करुन संस्थेस सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **अ** देण्यात आला आहे.

कर लेखापरिक्षण (टॅक्स) :

सन २०२२-२३ या अहवालसालाचे कर लेखापरिक्षण मा. श्री. वाय. एस. मुजुमदार आणि कंपनी सनदी लेखापाल मेंबर नं. ३३७०४ यांनी केले असून त्यांनी केलेल्या बहुमोल सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

प्रशिक्षण कार्यशाळा :

अहवाल सालात संस्थेची ध्येय धोरणे ठरवणे. उद्दिष्ट पुर्तीसाठी नियोजन करणे. कर्मचारी यांना अदयावत प्रशिक्षण देणे. यासाठी खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई : कर्मचारी यांना प्रत्यक्ष कामकाजाचे प्रशिक्षण देण्यात आले.

लोणावळा : संचालक मंडळ धोरणात्मक सभा घेण्यात आली व संचालक मंडळ प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले.

विक्रोळी : व्यक्तिमत्व विकास, कर्ज वसुली, पतसंस्थाचे कामकाज या विषयी प्रशिक्षण देण्यात आले.

अलिबाग : मा. श्री. नितीन वाणी सर - सह. संस्था प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन.

संस्थेचे मार्गदर्शक व ज्ञानदीप को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापक-संचालक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब सातत्याने संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण घेत असतात. त्यांच्या प्रशिक्षणामुळे ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण झाली याचा आम्हांला आनंद आहे. तसेच मुंबई सहकारी बोर्ड, महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई यांच्या सहकार्याने वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये उपस्थितांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीस चालना मिळाली.

कर्मचारी :

संस्थेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचेद्वारे अधिकाधिक चांगली ग्राहक सेवा देण्यासाठी, संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. यावर्षी निरनिराळ्या पध्दतीची सांधिक/व्यक्तीगत उद्दीष्टे दिल्यामुळे शाखांतर्गत अधिकारी-कर्मचारी यांचेसाठी वैयक्तिक स्तरावरही व्यवसाय वृध्दीसाठी उत्साहवर्धक वातावरणात होते. अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करुन त्यांची व्यक्तीगत तसेच शाखांसाठीची सामुहिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश मिळवले. त्यांचे हे प्रयत्न अभिमानास पात्र आहेत. संस्थेच्या वाढीबरोबर सभासदांचे संस्थेबद्दलचे प्रेम वृध्दींगत करण्याचे कार्य सर्व कर्मचारी करीत आहेत. दि. ३१ मार्च २०२३ अखेरीस संस्थेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ५८ कर्मचारी कार्यरत आहेत.

ठेव प्रतिनिधी :

संस्थेत एकूण ९८ इतके ठेव प्रतिनिधी कार्यरत असून संस्थेस ठेव संकलन करणे. कर्ज वसुलीच्या कामात सहभाग घेणे व संस्थेविषयी प्रचार, प्रसिध्दी करणे अशी महत्वाची कामे त्यांच्याकडून केली जातात. मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या धोरणानुसार प्रत्येक शाखेत किमान १० प्रतिनिधी असावेत. संचालक मंडळ व कर्मचारी यासाठी प्रयत्नशील आहे. इच्छुकांनी स्वयंस्फुर्तीने अशा कामासाठी संस्थेत कार्यरत असावे अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे.

सभासद अपघात विमा :

संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या संकल्पनेतून संस्थेने आपल्या सर्व सभासदांसाठी व कर्जदारांसाठी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्येक सभासदांना विनामूल्य रु. १ लाख विमा संरक्षण दिले जाते.

रौप्य महोत्सवी वर्ष :

संस्था २०२३ हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत असून या निमित्ताने अनेक कार्यक्रम योजना राबवत आहे. सभासदांच्या सहकार्याने भाग संकलन विशेष योजना राबविण्यात आली. त्यास आपण सर्वांनी भरघोस प्रतिसाद दिला त्यामुळे संस्थेच्या स्वनिधीत वाढ झाली आहे. त्याचा परिणाम संस्थेस मिळणाऱ्या गुणवारी वर झाला आहे.

संस्थेच्या प्रत्येक शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात येते. सभासदांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन संस्थेबद्दलची सर्व माहिती देण्याचा उपक्रम चालू आहे. सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून एकलव्य विद्यार्थी संघा मार्फत २५ विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले आहे. त्याच बरोबर प्रशिक्षण, रक्तदान शिबिर, देवस्थान समितीच्या साह्याने सेवा देत आहोत. रौप्य महोत्सवा मध्ये अनेक कार्यक्रम राबवण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. आपण त्यास सहकार्य करावे.

आपला ग्राहक जाणून घ्या :

महाराष्ट्राच्या सहकार विभागाने सभासदांची KYC पूर्ण करण्यासाठी अनेक सुचना लागू केलेल्या आहेत. त्यांचे आपण पालन करीत आहोत. पुर्वीच्या सभासदांनी सुध्दा आपली KYC ची पुर्तता करावी असे आपणांस सुचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्था बरेच व्यवहार सोशल मिडीया मार्फत चालवत आहेत. त्यामुळे आपण आपले अदयावत मोबाईल नं. द्यावेत.

संगणक प्रणाली :

संस्था अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सभासदांना सुलभ व अचूक सेवा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. भविष्याचा वेध घेऊन डिजीटल व्यवहार करण्यासाठी सभासदांना मोबाईल ॲप लवकरच देत आहोत यासाठी कॉमविझार्ड यांच्याकडून अदयावत संगणक प्रणाली घेण्यात आली असून संस्थेचा सर्व शाखा कोअर बँकींग सोलुशन (सी.बी.एस.) ने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळेच सभासदांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य होत आहे. दैनंदिन ठेव सुध्दा मोबाईल ॲप द्वारे सर्व प्रतिनिधी मार्फत जमा केली जाते.

कोअर बँकिग :

अहवाल वर्षात संस्थेने सभासदांकरीता सुरु केलेल्या विविध डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमाणसातील प्रतिमा उंचावली आहे.

१. एस. एम. एस. सुविधा :

संस्थेने एस. एम. एस. सुविधा सुरु करुन सभासदांना खात्यामधील व्यवहाराची माहिती ठेव मुदतपुर्ती दिनांक, खात्यावरील भरणा केलेली रक्कम खात्यावरील जमा असलेली रक्कम कर्ज हप्ता (ईएमआय) सुचना इत्यादी माहिती एस. एम. एस. सुविधेद्वारे देण्यात येते.

२. दैनंदिन ठेव ॲप :

संस्थेची दैनंदिन ठेव ही देखील संस्थेचे मोबाईल ॲपद्वारे होत असुन त्याचा त्वरीत एस. एम. एस. खातेदाराला जात आहे. त्यामुळे त्यामध्ये देखील अचुकता आली आहे.

३. मोबाईल ॲप :

सभासदांना आपले संस्थेतील खात्यावरील व्यवहार त्वरीत करता यावेत व त्याची माहिती व्हावी याकरीता मोबाईल बँकींग ॲपची सुविधा लवकरात लवकर चालु करत आहे. त्यामधुन खातेदारांना त्वरीत व्यवहार करता येणे शक्य होणार आहे. खातेदार आपली रक्कम हस्तांतर, फोन बिल, गॅस बिल, लाईट बिल, टिव्ही रिचार्ज इत्यादी सेवांचा लाभ घेता येणार आहे.

४. आर. टी. जी. एस./एन. ई. एफ. टी. :

या प्रणालीद्वारे ग्राहकांना सशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे खातेदारांची वेळेची व खर्चाची फार मोठी बचत होणार आहे.

५. पुरस्कार :

संस्थेने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल श्री शनैश्वर देवस्थान सोळशी नायगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा यांच्या तर्फे **"श्री शनैश्वर कृतज्ञता सहकार भूषण धर्मरक्षा पुरस्कार - २०२३"** देऊन गौरवण्यात आले.

६. शाखा कार्यालय जागा खरेदी :

संस्थेने अहवाल सालात वाई शाखेसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सकुंलातील गाळा नं. १५ व १६ खरेदी केलेली आहे.

श्रध्दांजली :

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हि ईश्वरचरणी प्रार्थना.

आभार :

संस्थेला सहकार क्षेत्रात नावलौकीक प्राप्त करुन देण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या ठेव प्रतिनिधी, संचालक मंडळ व सभासद वर्ग यांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, सर्व मंत्री, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे व त्यांचे सर्व अधिकारी वर्ग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुर्व उपनगरे (२), कोकण भवन, नवी मुंबई, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, त्यांचे सर्व अधिकारी तसेच मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था 'एस' विभाग, कोकण भवन, त्यांचे सर्व सहकारी, अधिकारी संस्था कार्यक्षेत्रातील सहकार खात्याचे विविध पदाधिकारी यांची संस्था ऋणी आहे. तसेच कामकाजास विशेष मदत करणारे मा. जिल्हा अधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक व त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

मा. आ. प्रविण दरेकर - अध्यक्ष मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, मा. शिवाजीराव नलावडे - अध्यक्ष बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, सर्व सहकारी संचालक, मा. श्री. जे. एस. पवार - महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मा. अंकुश जाधव - संपादक पतसंस्था व्यवस्थापन डायरी, मुंबई सहकारी बोर्ड यांचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ तसेच संस्थेशी संलग्न असलेल्या सहकारी पतसंस्थाचे, सहकारी बँकाचे अध्यक्ष, पदाधिकारी व संचालक मंडळ यांची संस्था ऋणी आहे.

संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, मालमत्ता व सोने यांचे मुल्यांकन करणारे व्हॅल्युअर, अंतर्गत हिशोब तपासनीस, वैधानिक लेखा परिक्षक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था ऋणी आहे. संस्थेचे संगणक प्रणाली विकासक, मे. कॉमविझार्ड प्रणालीचे प्रदिप भाटीया व युसुफ सर यांचे सर्व कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

एका अभिमानास्पद वळणावरुन संस्थेच्या प्रगतीचा प्रवास सुरु आहे. नव्या जबाबदाऱ्या, नवीन आकांक्षा, नवीन अपेक्षा, नव्या स्वप्नांच्या क्षितीजाकडे झेपावत असताना आपणां सर्वाच्या सहकार्याची अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

आपला विनम्र,

गणपतराव आनंदराव पवार

अध्यक्ष

❁ परिशिष्ट - अ ❁

संस्थेचे नांव	:	**पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**
कार्यालय पत्ता	:	१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८.
नोंदणी दिनांक	:	३१/१२/१९९८
नोंदणी क्रमांक	:	BOM/WS/RSR/CR/८३७४/१९९८
कार्यक्षेत्र	:	बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यापुरते.
सभासद संख्या	:	१३५२१
अधिकृत भाग भांडवल	:	१०,००,००,०००/-
वसुल भाग भांडवल	:	५,९४,१४,९००/-
राखीव व इतर निधी	:	५,५६,२४,५५९/-
ठेवी	:	१,४६,६९,८७,५५१/-
गुंतवणूका	:	२९,५२,७७,१२७/-
कर्जे	:	१,३५,४३,६५,६२४/-
सी. डी. रेशो	:	७९.६१%
बाहेरील कर्जे	:	३,५६,२३,५९६/-
अहवाल वर्षात निव्वळ नफा	:	८८,६६,७९७/-
ऑडीट वर्ग	:	अ
खेळते भांडवल	:	१,७७,११,४५,३४७/-
शाखा	:	१५
कर्मचारी संख्या	:	५८
ठेव प्रतिनिधी	:	९८
संमिश्र व्यवसाय	:	२८२ कोटी

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2023

31/03/2022	Liabilities	Amount	31/03/2023
1,50,00,000.00	**Authorised Share Capital** अधिकृत भाग भांडवल		**10,00,00,000.00**
4,60,58,700.00	Paid up Share Capital वसुल भाग भांडवल	4,60,58,700.00	
---	Add - Rec. During the year अधिक अहवालसाली जमा	1,75,52,000.00	
---	Less - Refund During the year अहवालसाली परत	41,95,800.00	5,94,14,900.00
	Reserve & Other Funds राखीव व इतर निधी		
1,25,23,647.00	Reserve Fund राखीव निधी	1,44,90,108.00	
—	Enterance Fee प्रवेश फी	23,570.00	
—	B Class Member नाममात्र सभासद	25,550.00	1,45,39,228.00
1,26,48,079.00	Reserve for Bad & Doubtful Debts बुडीत कर्ज निधी	1,42,01,978.00	
1,96,18,381.00	Building Fund इमारत निधी	2,27,51,131.00	
4,37,491.00	Member Welfare Fund सभासद कल्याण निधी	4,62,491.00	
8,41,620.00	Staff Welfare Fund कर्मचारी कल्याण निधी	7,66,600.00	
81,606.00	Charitable Fund धर्मदाय निधी	1,03,131.00	
26,50,000.00	Standard Assets Prov. उत्पादीत कर्ज तरतूद	26,50,000.00	
—	Silver Jubilee Fund सिल्वर ज्युबिली फंड	1,50,000.00	4,10,85,331.00
	Deposits ठेवी		
7,27,87,091.00	Daily Deposits दैनंदिन ठेव	8,25,97,979.00	
4,46,45,281.00	Saving Deposits बचत ठेव	5,50,74,537.00	
1,19,92,351.00	Recurring Deposits आवर्त ठेव	1,57,64,592.00	
28,89,64,240.00	Fixed Deposits मुदत ठेव	33,69,62,801.00	
4,45,89,585.00	Double/Bonus Deposits दामदुप्पट/बोनस ठेव	4,34,73,932.00	
2,60,670.00	Agent Security Deposits प्रतिनिधी सुरक्षा ठेव	3,37,070.00	
25,87,70,665.00	Monthly Interest Deposits मासिक व्याज ठेव	29,12,74,765.00	
43,51,53,407.00	Shubarambh Deposits शुभारंभ ठेव	53,19,57,132.00	
6,85,72,081.00	Short Term Deposits अल्प मुदत ठेव	8,96,32,449.00	
16,55,119.00	Pushpanand Deposits पुष्पानंद ठेव	38,84,072.00	
1,53,700.00	Loan Security Deposits कर्ज सुरक्षा ठेव	31,200.00	
93,12,390.00	Lakpati Deposits लखपती ठेव	1,03,20,979.00	
39,15,750.00	Suvarna/Vidhyut Pushpa Deposits सुवर्ण/विद्युत पुष्प ठेव	7,05,750.00	
24,55,456.00	Pushpasamruddhi Deposits पुष्प समृध्दी ठेव	28,51,087.00	
8,20,000.00	Viman Pushpa Deposits विमान पुष्प ठेव	3,65,000.00	
15,03,461.00	Staff Security Deposits स्टाफ सिक्युरिटी ठेव	17,54,206.00	1,46,69,87,551.00
5,49,47,704.00	**Borrowings** बँक ओडी खाते		3,56,23,596.00
	Other Liabilities इतर देणी व तरतुदी		
14,084.00	Surcharge Account सरचार्ज खाते	32,999.00	
8,975.00	Professional Tax (PT) व्यवसाय कर	9,950.00	
49,139.00	Insurance & Development Fund विकास निधी	42,983.00	
79,713.00	Tax Deducted at Source टी. डी. एस. खाते	28,330.00	
7,27,000.00	Audit Fee Payable ऑडीट फी देय	8,07,000.00	
1,10,169.00	Employees P. F. Contribution कर्मचारी पी. एफ.	1,45,178.00	10,66,440.00
35,88,503.00	Unclaimed Dividend न घेतलेला लाभांश		29,57,485.00
13,59,67,619.00	**Interest Payable** ठेवीवरील देणे व्याज		14,05,99,104.00
	P & L Appropration A/c नफा तोटा खाते	4,915.00	
76,52,776.00	Add : Current year profit अधिक चालू वर्षाचा नफा	88,66,797.00	88,71,712.00
1,54,35,56,453.00	**Total**		**1,77,11,45,347.00**

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2023

31/03/2022	Assets	Amount	31/03/2023
	Cash & Bank Balance रोख व बँक शिल्लक		
14,673.00	Cash in Hand रोख शिल्लक	13,13,663.00	
12,78,237.00	Cash at Bank बँक शिल्लक	46,20,000.00	59,33,663.00
	Investments गुंतवणूक		
7,91,28,641.00	F.D. at M.D.C. Bank मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	9,17,10,244.00	
7,31,64,374.00	F.D. at Jaoli/Satara Bank मुदत ठेव जावली/सातारा बँक	10,69,29,928.00	
2,21,45,152.00	F.D. at Sopan Bank मुदत ठेव सोपान बँक	2,75,56,455.00	
1,00,14,433.00	F.D. at Saraswat Bank मुदत ठेव सारस्वत बँक	88,80,029.00	
4,53,05,798.00	F.D. with Society मुदत ठेव सोसायटी	4,53,05,798.00	
1,20,72,007.00	F.D. at M.D.C.C. Bank (R/F) मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	1,39,43,173.00	
9,21,000.00	Share with M.D.C. Bank भाग मुंबै बँक	9,21,000.00	
10,000.00	Share with K.S.S.K. Ltd. भाग साखर कारखाना	10,000.00	
1,000.00	Share with M.R.S.P. Fed. भाग महा. पतसंस्था फेडेरेशन	1,000.00	
7,500.00	Share with P.U.Z.P. Fed. भाग पूर्व उपनगरे फेडेरेशन	9,500.00	
10,000.00	Share with D.G.C. Ltd. भाग डी.जी.सी. लि.	10,000.00	29,52,77,127.00
	Security Deposits सुरक्षा अनामत		
13,320.00	Telephone Deposits टेलिफोन अनामत	13,320.00	
17,725.00	Electricity Deposits विज अनामत	17,725.00	
2,10,39,953.00	Office Building कार्यालय इमारत	2,10,39,953.00	
2,09,92,100.00	Building Security Depo. इमारत अनामत	2,24,02,100.00	
5,000.00	Security Depo. at BEST बी.ई.एस.टी. अनामत	5,000.00	
4,90,000.00	Office Deposits कार्यालय अनामत	4,10,000.00	
6,70,123.00	Security Depo. at Msed महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड	6,70,123.00	4,45,58,221.00
	Fixed Assets कायम स्वरुपी मालमत्ता		
66,030.00	Air Condition ए. सी.	1,10,397.00	
39,67,027.00	Furniture & Fixture फर्निचर व फिक्चर	55,01,202.00	
12,91,093.00	Computer Equipments संगणक	23,36,312.00	
1,16,612.00	Daily Collection Machine दै. कलेक्शन मशीन	1,56,747.00	81,04,658.00
	Loan कर्ज		
2,16,23,845.00	Personal Loan वैयक्तिक कर्ज	2,75,70,186.00	
2,40,43,750.00	Daily Personal Loan दै. ठेव वैयक्तिक कर्ज	2,03,31,530.00	
2,96,90,987.00	Group Personal Loan गट वैयक्तिक कर्ज	10,41,10,263.00	
8,85,40,504.00	Vehicle Loan वाहन कर्ज	8,11,43,002.00	
73,37,41,650.00	Business Loan व्यवसाय कर्ज	78,38,27,967.00	
12,70,21,387.00	Against Depo. Loan ठेव तारण कर्ज	12,71,69,457.00	
5,47,03,486.00	Security Personal Loan सुरक्षित वैयक्तिक कर्ज	5,43,20,536.00	
9,13,10,804.00	Arbitration Loan लवादी कर्ज	11,87,96,316.00	
27,53,283.00	Staff Personal Loan कर्मचारी वैयक्तिक कर्ज	58,01,925.00	
1,76,91,900.00	Staff Housing Loan कर्मचारी गृहतारण कर्ज	2,16,54,723.00	
78,82,145.00	Gold Loan सोने तारण	91,57,465.00	
—	Agent Personal Loan एजंट वैयक्तिक कर्ज	4,90,254.00	1,35,43,65,624.00
4,87,62,969.00	**Int. Receivable** व्याज येणे		5,95,13,107.00
	Other Assets इतर मालमत्ता		
23,670.00	Adheshive Stamps अधेसिव्ह स्टॅम्प	14,380.00	
15,80,071.00	T.D.S. Receivable टी.डी.एस.	20,30,753.00	
14,25,904.00	Sainath Credit Society साईनाथ क्रे. सोसा.	12,83,314.00	
17,800.00	Festival Advance फेस्टिवल	64,500.00	33,92,947.00
1,54,35,56,453.00	**Total**		**1,77,11,45,347.00**

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2023

31/03/2022	Expenditure	Amount	31/03/2023
11,31,58,515.00	Interest on Deposits ठेवीवरील व्याज		12,20,17,070.00
40,24,030.00	Interest on Bank Loan बँक कर्जावरील व्याज		16,90,590.00
1,16,18,831.00	Salary पगार	1,35,35,064.00	
8,95,406.00	Stipend विद्यावेतन	4,33,309.00	
5,99,072.00	Bonus & Emp. Gratuity बोनस व कर्मचारी ग्रॅज्युटी	6,92,951.00	
14,77,710.00	Employee P. F. Exp. कर्मचारी पी. एफ. खर्च	15,93,897.00	1,62,55,221.00
1,05,306.00	Postage & Telegram पोस्टेज व टेलिग्राम	1,57,785.00	
4,06,938.00	Rents कार्यालय भाडे	6,78,205.00	
1,39,506.00	Travelling Exp. प्रवास खर्च	2,38,812.00	
2,90,717.00	Electricity Exp. वीज खर्च	3,33,819.00	
6,48,200.00	Insurance Exp. विमा खर्च	8,79,336.00	
3,04,543.00	Repair & Maintance दुरुस्ती खर्च	2,08,121.00	
4,14,819.00	Annual Maintanance Exp. वार्षिक देखभाल खर्च	5,15,900.00	
4,644.00	GST Exp. जी. एस. टी. खर्च	62,914.00	
1,25,619.00	Misc. Exp. किरकोळ खर्च	1,00,431.00	
12,135.00	News Paper वर्तमान पत्र	12,655.00	
1,60,926.00	Printing & Stationary छपाई स्टेशनरी खर्च	4,12,351.00	
57,617.00	Pooja Exp. पूजा खर्च	62,137.00	
3,37,487.00	Telephone Exp. टेलिफोन खर्च	2,52,897.00	
36,71,129.00	Commission Exp. कमिशन खर्च	47,65,173.00	
9,660.00	Legal Fees कायदेशीर शुल्क	5,730.00	
41,862.00	Loan Recovery Charges कर्ज वसुली खर्च	10,24,465.00	
2,11,829.00	Bank Charges बँक चार्जेस	55,859.00	
8,49,106.00	Audit Exp. लेखापरिक्षण फी	9,97,778.00	
10,660.00	Advertisement जाहिरात	1,11,346.00	
1,22,492.00	Professional Charges व्यवसाय खर्च	1,93,288.00	
2,98,391.00	Entertainment Exp. चहापान खर्च	4,07,441.00	
22,342.00	A. G. M. Exp. वार्षिक सभा खर्च	61,675.00	
—	Silver Jubilee Exp. सिल्वर ज्युबिली खर्च	96,559.00	
12,83,208.00	Recovery Charges वसुली खर्च	12,08,437.00	
27,100.00	Licence Fee परवाना शुल्क	8,000.00	
1,21,664.00	Cleaning Exp. साफसफाई खर्च	1,41,353.00	
47,409.00	Water Exp. पाणी बिल	38,484.00	
7,480.00	Training Exp. प्रशिक्षण खर्च	1,84,504.00	
50,760.00	Meeting Exp. सभा खर्च	74,260.00	
—	Subscription सदस्यता	9,750.00	
—	Branch Opening Exp. शाखा खर्च	83,753.00	
6,616.00	T.D.S. Exp. (Mseb) टॅक्स	—	1,33,83,218.00
9,29,965.00	Deprication घसारा	13,50,928.00	13,50,928.00
76,48,488.00	Profit & Loss A/c नफा तोटा खाते		88,66,797.00
15,01,42,182.00	**Total**		**16,35,63,824.00**

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2023

31/03/2022	Income	Amount	31/03/2023
1,43,72,648.00	Interest on Bank Deposit ठेवीवरील व्याज	1,68,56,554.00	
13,30,86,018.00	Interest on Loan कर्जावरील व्याज	14,16,05,808.00	15,84,62,362.00
12,98,539.00	Misc. Income किरकोळ जमा	25,38,069.00	
1,67,701.00	M.s.e.d. Commission एम. एस. ई. डी. कमिशन	2,11,603.00	
11,71,270.00	Processing Charges सर्व्हिस चार्ज	23,51,790.00	
46,006.00	Dividend on M.D.C. Bank लाभांश मुंबै बँक	—	51,01,462.00
15,01,42,182.00	**Total**		**16,35,63,824.00**

अंदाजपत्रक २०२३-२४

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
भांडवल व देणी	सन २२/२३	सन २२/२३	सन २३/२४	मालमत्ता व येणी	सन २२/२३	सन २२/२३	सन २३/२४
वसुल भाग भांडवल	५५२७०४४०	५९४१४९००	७१२९७८८०	रोख व बँक शिल्लक	१४८६८४७	५९३३६६३	६८२३७१३
राखीव व इतर निधी	५६१२०९४८	५५६२४५५९	६३९६८२४३	गुंतवणुक	३०३४७४८८१	२९५२७७१२७	३६९०९६४०९
सभासद ठेवी	१४३२३८३९३४	१४६६९८७५५१	१६८७०३५६८४	सभासद कर्ज	१३५४८७४७९२	१३५४३६५६२४	१५३०४३३१५५
ठेवीवरील व्याज तरतुद	१५५००३०८६	१४०५९९१०४	१५८६८२४८६	कायम व इतर मालमत्ता	६११७२९३	८१०४६५८	९०४७५७९
इतर येणी व तरतुदी	५८७३३६२३	३६६९००३६	३८५२४५३८	सुरक्षा अनामत/कार्यालय	४७११८७६१	४४५५८२२१	४७७६८४६१
लाभांश देणे बाकी	४०१९१२३	२९५७४८५	३३१२३८३	ठेवीवरील येणे व्याज	५४१२६८९६	५९५१३१०७	६६०५९५४९
एकूण नफा	८८३७६५९	८८७१७१२	९९३६३१७	इतर येणी	३१६९३४३	३३९२९४७	३५२८६६५
एकूण	**१७७०३६८८१३**	**१७७११४५३४७**	**२०३२७५७५३०**	**एकूण**	**१७७०३६८८१३**	**१७७११४५३४७**	**२०३२७५७५३०**

	अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज		अंदाज	प्रत्यक्ष	अंदाज
खर्च तपशील	सन २२/२३	सन २२/२३	सन २३/२४	जमा तपशील	सन २२/२३	सन २२/२३	सन २३/२४
ठेवीवरील व्याज	१३०१३२२९२	१२२०१७०७०	१४०३१९६३१	कर्जावरील व्याज	१५३०४८९२१	१४१६०५८०८	१६२८४६६७९
बँक कर्ज व्याज	४६२७६३५	१६९०५९०	२२७२२२५	इतर उत्पन्न	३०३३१३७	५१०१४६२	५८६६६८१
पगार व इतर भत्ते	१६७७९६७२	१६२५५२२१	१८६९३५०४	बँक लाभांश	४८३०६	०	०
प्रशासकीय खर्च	११२५८६९०	१३३८३२१८	१५३९०७०१	गुंतवणुकीवरील व्याज	१६५२८५४५	१६८५६५५४	१९३८५०३७
तरतुदी व इतर खर्च	१०२२९६१	१३५०९२८	१४८६०२१				
नफा	८८३७६५९	८८६६७९७	९९३६३१७				
एकूण	**१७२६५८९०९**	**१६३५६३८२४**	**१८८०९८३९८**	**एकूण**	**१७२६५८९०९**	**१६३५६३८२४**	**१८८०९८३९८**

नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) नुसार)

प्रति,
अध्यक्ष
पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग,
कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैद्यानिक लेखापरिक्षण अभिप्राय :

१. पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेचे दि. १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक आणि त्यात समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षनीय चुकांपासून मुक्त राहतील, अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी :

३. आर्थिक पत्रके बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मान दंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची अकानी व अमंलबजावणी अशा प्रकारे करावी की ज्या येणे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न झालेले दोष आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनीयोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण याचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

अभिप्राय :

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेली टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२३ ची स्थिती आणि

२. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

मी अहवाल करतो की :

८. अ. लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.

ब. आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

क. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करुन आलेले शाखा लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

ड. संस्थेस चालू तपासणी कालावधी सन २०२२-२३ या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

सही,
मे. एच. पी. भालेकर अॅन्ड असोसिएटस
सनदी लेखापाल
सहकारी संस्था, पॅनल क्र. १०९४५

दिनांक : २२ ऑगस्ट २०२३

❋ पोटनियम दुरुस्ती ❋

पो. क्र.	अस्तित्वात असलेली शब्दरचना	दुरुस्ती नंतरची शब्दरचना	दुरुस्तीचे कारण
अ.२.१	वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना - १. वार्षिक साधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.	वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना - १. वार्षिक साधारण सभेची सूचना १४ दिवस अगोदर वर्तमानपत्र व समाज माध्यमाद्वारे (Social Media) प्रसिध्द करण्यात येवून बोलावली जाईल.	संस्थेची सभासद संख्या जवळ पास १३ हजार असल्यामुळे नोटीस पोस्ट करणे. वेळखाऊ व खर्चिक आहे.
	२. विशेष साधारण सभा ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.	२. विशेष साधारण सभेची सूचना ७ दिवस अगोदर वर्तमानपत्र व समाज माध्यमाद्वारे (Social Media) प्रसिध्द करण्यात येवून बोलावली जाईल.	संस्थेची सभासद संख्या १३ हजाराच्या वर असल्यामुळे नोटीस पोस्ट करणे वेळखाऊ व खर्चिक आहे.
५३ कर्ज व्यवहार परिशिष्ट क - ५	अ. क्र. / कर्ज प्रकार / कमाल कर्ज मर्यादा १ / सामान्य कर्ज / रु. १,००,०००/- पर्यंत	अ. क्र. / कर्ज प्रकार / कमाल कर्ज मर्यादा १ / सामान्य कर्ज / रु. ५,००,०००/- पर्यंत	सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी म्हणून
निधी ७	४. अतिरिक्त भाग सभासदांना परत करणे.	४. सभासद झाल्यानंतर संस्थेचे अतिरिक्त भाग खरेदी केले असतील व सभासदांना निधीची आवश्यकता भासल्यास अतिरिक्त भाग परत करता येतील.	सभासदांच्या मागणीवरुन

❋ पुष्पक प्रगती अहवाल ❋

तपशील	मार्च २०१८	मार्च २०१९	मार्च २०२०	मार्च २०२१	मार्च २०२२	मार्च २०२३
सभासद	४०३६	६३७२	८३७३	९५७३	११३४०	१३५२१
वसुल भाग भांडवल	१९३७२७००	३१९७११००	४२४४५६००	४५२०७८००	४६०५८७००	५९४१४९००
राखीव व इतर निधी	३५०२३१२२	३९८९२३१०	४४४३९००७	४७३२४६६७	४८८००८२४	५५६२४५५९
एकूण ठेव	७६७२२२३१४	९२०००५७५७	१०३७६१०५७७	१०८७४८४४०१	१२४५५५१२४७	१४६६९८७५५१
कर्ज येणे	७४७८३०६६९	९०५२९३१३३	१०२४७५६८७२	१०७७१२८९१३	११९९००४२४१	१३५४३६५६२४
गुंतवणूक	१५३१७१७१९	१९६५५६१६२	२०५७१२४८३	२१७८१८०८०	२४२७७९९०५	२९५२७७१२७
निव्वळ नफा	४८७१११६	५९१२४८५	५९९४९४८	४६९००८२	७६४८४८८	८८६६७९७
लाभांश	१३	१३	१०	८	८	१० *
खेळते भांडवल	९६२३१५०४१	११६७१८३४७४	१३२०२८३०२७	१३८९८७४९६४	१५४३५५६४५३	१७७११४५३४७
ऑडिट वर्ग	अ	अ	अ	अ	अ	अ
कर्मचारी व प्रतिनिधी	१०९	१११	१२०	११९	११३	१५२

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रौप्य महोत्सवी क्षणचित्रे

वाटचाल अर्थसेवेची... चमक विश्वासाची...

संस्थेच्या रौप्य महोत्सव निमित्त विष्णूदास भावे नाट्यगृह, वाशी येथेपार पडलेल्या कार्यक्रमास उपस्थित असलेले सभासद वर्ग व मान्यवर.

संस्थेच्या नऱ्हे व वाई शाखेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे मार्गदर्शक श्री. व्हि. जी. पवार साहेब व मान्यवर.

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल शनैश्वर संस्था, सोळशी नायगांव यांच्यातर्फे श्री शनैश्वर कृतज्ञता सहकार भूषण धर्मरक्षा पुरस्कार २०२३ देऊन गौरवण्यात आले.

पुष्पक परिवार

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

प्रशासकीय कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर,
एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई – ७८
☎ ०२२ २५७८ ०२३६ / ७०२८०००७८७
www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

बुक - पोष्ट

प्रति,
श्री./श्रीमती ____________________

____

____

Matoshree Design : 9082204814